# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १६ ऑक्टोबर २०२४


## आयोगाने शरद पवार गटाची मागणी फेटाळली - पिपाणी पुन्हा मैदानात




**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकी कार्यक्रम करण्यात आली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने आज दुपारी पत्रकार परिषद घेत यासंदर्भात माहिती दिली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून केलेल्या मागणीवर निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण दिले. शरद पवार गटाकडून पिपाणी चिन्ह गोठवण्याची मागणी निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती. मात्र ही मागणी आयोगाने फेटाळली आहे. हा शरद पवार गटाला मोठा धक्का मानला जात आहे. कारण लोकसभा निवडणुकीत तुतारी आणि पिपाणी या चिन्हांमुळे मोठा गोंधळ झाला होता.

अजित पवार यांनी बंड केल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे घड्याळ हे चिन्ह त्यांच्याकडे गेले. त्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाला निवडणूक आयोगाने तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह दिले आहे. मात्र लोकसभा निवडणुकीत तुतारी आणि पिपाणी ही चिन्हे सारखीच दिसत असल्यामुळे मोठा गोंधळ झाला होता. चिन्हांच्या साम्यामुळे अनेकांनी तुतारीऐवजी पिपाणीचे बटण दाबले, असे म्हटले जात आहे. त्यामुळे या निवडणूक चिन्हाबाबत शरद पवार गटाने निवडणूक आयोगाने दोन विनंती केल्या होत्या. त्याची नोंद निवडणूक आयोगाने घेतली आहे.

**काय म्हणाले निवडणूक आयोग**

तुतारी वाजवणारा माणूस चिन्ह योग्य नाही. ते मतपत्रिकेवर छोटे दिसते. ते मोठे करण्याची पहिली विनंती केली होती. तसेच तुतारी सारखे दिसणारे दुसरे चिन्ह हटविण्यात यावे, ही दुसरी विनंती केली होती.

यावर निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले की, आम्ही त्यांची पहिली विनंती मान्य केली असून त्याची योग्य दखल घेतली आहे. त्यांना तुतारी चिन्ह कसे दिसले पाहिजे याबाबत आम्ही त्यांना विचारणा केली असता, त्यांनी उत्तर देऊन आकार दिला. त्यांनी दिलेल्या आकारातील पाहिला आकार आम्ही मान्य केला आहे, असे ते म्हणाले.

दुसरे चिन्ह पिपाणी हे सेम नाही. असे आम्ही त्यांना सांगितले आहे, असेही आयुक्त राजीव कुमार यांनी यावेळी स्पष्ट केले. लोकसभा निवडणुकीनंतर आता राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाला तुतारी सारख्या दिसणाऱ्या पिपाणी चिन्हाचा सामना करावा लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**सातारा लोकसभा मतदारसंघात पिपाणीने घेतली ३७ हजार मते**

सातारा लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून शशिकांत शिंदे हे उभे होते. त्यांची भाजपचे उमेदवार उदयनराजे भोसले यांच्याशी थेट लढत होती. या निवडणुकीत शशिकांत शिंदे यांचा ३२ हजार ७७० मतांनी पराभव झाला होता. पिपाणी चिन्ह भेटलेल्या संजय गाडे या अपक्ष उमेदवाराला ३७ हजार ६२ इतकी मते मिळाली.

**पिपाणीमुळे बजरंग सोनवणेंचा थोडक्यात विजय** बीड लोकसभा मतदारसंघातही बजरंग सोनावणे विरुद्ध पंकजा मुंडे यांच्यात झालेल्या लढतीत चिन्हाच्या गोंधळामुळे बजरंग सोनावणे यांना खुप मोठा फटका बसला होता. या मतदारसंघातही अशोक थोरात या बहुजन महा पार्टीच्या उमेदवाराला पिपाणी चिन्ह देण्यात आले होते. त्यामुळे थोरात यांना ५४ हजार ८५० मते मिळाली.

**सहा मतदारसंघामध्ये पिपाणी तिसऱ्या-चौथ्या क्रमांकावर**

१. बारामती मतदारसंघात सोयल शहा शेख यांना १४ हजार ९१७ मते मिळाली. ते चौथ्या क्रमांकावर राहिले.

२. शिरुरमध्ये अपक्ष उमेदवार मनोहर वाडेकर यांना २८ हजार ३३० मते पडली. ते तिसऱ्या क्रमांकावर राहिले.

३. अहमदनगरमध्ये मोहन आळेकर या अपक्ष उमेदवाराला ४४ हजार ५९७ मते मिळाली. ते तिसऱ्या क्रमांकावर होते.

४. रावेरमध्ये एकनाथ साळुंखे ४३ हजार ९८२ मते घेऊन चौथ्या क्रमांकावर राहिले.

५. भिवंडीत न्यू राष्ट्रीय समाज पक्षाच्या कांचन वखारे यांनी २४ हजार ६२५ मते घेतली. त्या चौथ्या क्रमांकावर राहिल्या.

६. वर्धामध्ये मोहन रायकवर २० हजार ७९५ मते घेऊन तिसऱ्या क्रमांकावर राहिले.

## नोव्हेंबरलाच जनता सत्ताधाऱ्यांचा निकाल लावणार - अंबादास दानवे



**छत्रपती संभाजीनगर :** केंद्रीय निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेत महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. २० नोव्हेंबरला राज्यात मतदान होणार असून, २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. यंदाच्या निवडणूक निकालाच्या तारखेवरुन विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादार दानवे यांनी महायुती सरकारवर निशाणा साधला आहे. पहाटेच्या शपथविधीच्या तारखेच्या दिवशीच जनता यांचा निकाल लावेल, असा विश्वास दानवे यांनी व्यक्त केला आहे. याबाबत अंबादास दानवे यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे.

२०१९ विधानसभा निवडणुकीत भाजप आणि शिवसेना यांना बहुमत मिळाले होते. मात्र काही वादामुळे भाजप-शिवसेना युतीचे सरकार स्थापन होऊ शकले नाही. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदासाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत जाण्याचा निर्णय घेतला, अशी चर्चा होती. त्यानंतर २३ नोव्हेंबर २०१९ रोजी देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी युती करत पहाटेच्या सुमारास मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली होती. पहाटेचा शपथविधी म्हणून याची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगली होती. अंबादास दानवे यांनी आपल्या पोस्टमध्ये महायुती सरकारला पहाटेच्या शपथविधीची आठवण करुन दिली आहे. पहाटेच्या शपथविधीचा एक फोटोही त्यांनी शेअर केला आहे. 'हा फोटो आठवतोय ना? या पहाटेच्या शपथविधीची तारीख होती २३ नोव्हेंबर २०१९. आता २३ नोव्हेंबर २०२४ रोजीच महाराष्ट्राची जनता आणि महाविकास आघाडी यांचा निकाल लावणार आहे.' काळे जॅकेट आणि पांढरा शर्ट घातलेले या फोटोतील नेते आता गेले दोन वर्षांतील घटनाबाह्य सरकारच्या काळातील जंत्री आपल्यापुढे वाचतील. मात्र यांनी पाच वर्षांपूर्वी केलेला हा पहाटेचा शपथविधी फक्त लक्षात ठेवावा.. बाकी विजय आपलाच आहे, असे दानवे यांनी म्हटले आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## जिथे जरांगेचा उमेदवार तिथे ओबीसी उमेदवार उभा करणार - लक्ष्मण हाके





**मुंबई :** महाराष्ट्रावर मनोज जरांगे नावाचे वटवाघूळ बसू देणार नाही, असा हल्लाबोल ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केला आहे. विधानसभा निवडणूक जाहीर होताच मराठा नेते मनोज जरांगे यांनी महायुती सरकारच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. तसेच मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर देखील निशाणा साधला आहे. यानंतर लक्ष्मण हाके यांनी देखील जरांगे यांच्या विरोधात जोरदार हल्लाबोल केला आहे.

**काय म्हणाले लक्ष्मण हाके?**

महाराष्ट्राच्या मानेवर जरांगे नावाचे वटवाघूळ बसू देणार नाही. जिथे जिथे जरांगे पाटील उमेदवार देतील तिथे ओबीसीचा उमेदवार असेल, असे लक्ष्मण हाके यांनी सांगितले आहे. घराणेशाही पुरस्कृत असलेल्या शरद पवार आणि इतर नेत्यांना ओबीसीला महत्त्वाचे पद द्यावे, असे का कधी वाटले नाही? असा सवाल देखील लक्ष्मण हाके यांनी उपस्थित केला आहे.

पुढे बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, ही निवडणूक आरपारची आहे. आता नाही तर पुन्हा लवकर नाही. राज्यातील सत्तेत असलेली महत्त्वाची पदे कधीच ओबीसी नेत्याच्या वाटेला आली नाहीत. आता ओबीसी गप्प बसणार नाहीत, तो चांगला धडा शिकवेल, असा इशारा हाके यांनी दिला आहे.

**काय म्हणाले मनोज जरांगे पाटील?** विधानसभा निवडणुकीची तारीख जाहीर झाल्यावर मनोज जरांगे यांनी महायुती सरकारच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देखील त्यांनी टार्गेट केले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मराठ्यांना बेदखल करण्याचे काम केले आहे. सरकारकडून मराठ्यांना आशा होती की, सरकार आपल्या लेकरांना आरक्षण देईल. पण ती आशा आता सरकारने संपवली आहे. मराठ्यांची पोरं आरक्षणापासून वंचित राहिली पाहिजेत, भिकारी झाली पाहिजेत यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी मराठ्यांच्या विरोधात काम केले, असा आरोप मनोज जरांगे यांनी केला आहे.

दरम्यान, मनोज जरांगे पाटील विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवार जाहीर करणार की नाही हे अद्याप समजू शकले नाही. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाचा प्रभाव लोकसभा निवडणुकीच्यावेळी दिसून आला. याचा फटका महायुती सरकारला बसला होता. आता विधानसभेच्या निवडणुकीत देखील फटका बसणार का याकडे आता लक्ष असणार आहे.